दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ३१० गुरूवार दि.१२ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## 'समृद्धी महामार्ग' वाढवण बंदराशी जोडणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई / के रवी दादा :- इगतपुरी येथे हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग राज्याच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणार आहे. हा महामार्ग राज्याच्या समृद्धीचा कॉरिडॉर ठरणार आहे. येत्या काळात या महामार्गाला वाढवण बंदराशी जोडण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण व सायन पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्रमांक तीन दक्षिण वाहिनीचा लोकार्पण सोहळा दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, अन्न व औषध प्रशासन, विशेष साहाय मंत्री नरहरी झिरवाळ, सार्वजनिक बांधकाम (सा. उ.) राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, आमदार निरंजन डावखरे, आमदार नितीन पवार, आमदार सरोज अहिरे, आमदार हिरामण खोसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष अनिल गायकवाड आदी उपस्थित होते. समृद्धी महामार्गासह पालखी मार्गावर वन विभागाच्या माध्यमातून वृक्षारोपण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, समृद्धी महामार्गासाठी विक्रमी वेळेत भूसंपादन करण्यात आले आहे. या मार्गामुळे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्हे जेएनपीटी बंदराशी जोडले गेले आहेत, आता हा महामार्ग वाढवण बंदराशी जोडला जाईल. ७०१ किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी ५५ हजार ३३५ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे.

समृद्धी महामार्गाचा ७६ किलोमीटर मार्ग नाशिक आणि ठाणे जिल्ह्यातून जातो. या भागात सह्याद्रीच्या डोंगर रांगा असून अतिशय खडतर भौगोलिक परिस्थितीत मार्ग काढत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे अभियांत्रिकी आव्हान पेलले. यातील इगतपुरीजवळील बोगदा हा ८ किलोमीटर लांबीचा असून तो राज्यातील सर्वाधिक लांबीचा आणि देशातील सर्वाधिक रुंदीचा बोगदा आहे.

समृद्धी महामार्गासह पालखी मार्गावर वन विभागाच्या माध्यमातून वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गामुळे एक हजार शेततळी तयार झाली आहेत. याबरोबरच दर ५०० मीटरवर जलपुनर्भरण व्यवस्था करण्यात आली आहे. या महामार्गालगत सौर ऊर्जा निर्मिती करण्यात येणार आहे. त्यापैकी ३५ मेगावॉट प्रकल्पाचे काम सुरू आहे. महामार्गालगत गेल कंपनीतर्फे गॅस वाहिनी टाकण्यात आली आहे. या माध्यमातून नव्याने विकसित होणाऱ्या स्टीलसिटी गडचिरोली पर्यंत गॅस पोहोचविता येईल. तसेच धार्मिक आणि पर्यटनस्थळे या मार्गामुळे जोडली आहेत. वाशी खाडीवरील तिसऱ्या पुलामुळे वाहतूक सुलभ होण्यास मदत होईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

महामार्ग अपघातमुक्त करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या महामार्गामुळे वन्यजीवांच्या संचारात अडथळे येऊ नयेत म्हणून १०० प्रकारच्या संरचना तयार करण्यात आल्या आहेत. देशात अशा प्रकारची रचना प्रथमच साकारण्यात आली आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांचा संचार विना व्यत्यय सुरू आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आगामी काळात शक्तिपीठ महामार्ग साकारण्यात येणार आहे. या महामार्गामुळे मराठवाड्यातील आर्थिक चित्र बदलण्यास मदत होईल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

कृषी, पर्यटन विकास, औद्योगिकीकरणाला चालना

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, समृद्धी महामार्गामुळे वेळ, इंधनाची बचत होणार आहे. प्रदूषणास आळा बसणार आहे. या महामार्गामुळे कृषी, पर्यटन विकास, औद्योगिकीकरणाला चालना मिळणार आहे. पर्यावरणपूरक असा महामार्ग राज्याच्या विकासात गेम चेंजर ठरेल. तसेच नाशिक जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

समृद्धी महामार्ग मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण भागासाठी लाभदायक ठरेल,

त्याचप्रमाणे शक्तिपीठ महामार्ग उपयुक्त ठरेल. या महामार्गावर प्रवाशांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. या महामार्गावर वाहन चालकांनी वेग मर्यादेचे व वाहतूक निमयांचे पालन करावे, असेही आवाहन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

अन्य प्रकल्पांनाही गती

जागतिक पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा देत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पर्यावरण संवर्धनासाठी यंदा १० कोटी रोपांच्या लागवडीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या महामार्गानंतर आता राज्यातील अन्य प्रकल्पांनाही गती देण्यात येईल, असे सांगत त्यांनी या प्रकल्पासाठी परिश्रम घेणारे अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांचे उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी कौतुक केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी समृद्धी महामार्गाचे लोकार्पण केले. त्यानंतर मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्यासह मान्यवरांनी महामार्गाची पाहणी केली. यावेळी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी वाहनाचे सारथ्य केले.

## मंगळवारचा आठवडी बाजार फलोउत्पादनाच्या जागेत स्थलांतरित करण्यात यावा- चंद्रकांत खरात सर

### तात्काळ प्रशासनाने दखल न घेतल्यास संघटनेच्यावतीने आंदोलनाचा दिला इशारा

केज/प्रतिनिधी-केज येथील मंगळवारचा आठवडी बाजार हा फलोत्पादनाच्या जागेत स्थलांतरित करण्यात यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी तहसीलदार केज यांच्याकडे केली आहे. जर प्रशासनाने निवेदनाची तात्काळ दखल न घेतल्यास भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने आंदोलन करण्याचा प्रशासनास इशारा दिला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज शहराची व्याप्ती वाढली असून सध्या मंगळवारच्या आठवडी बाजार भरत असलेले ठिकाण व त्या ठिकाणची जागा ही बाजार भरण्यासाठी अपुरी पडत आहे. सदर बाजार हा मेन रोडवर भरवण्यात येत आहे, परंतु केज शहराची व तालुक्याची व्याप्ती पाहता सदर बाजाराची जागा शहराच्या दृष्टिकोनाने अपुऱ्या स्वरूपाचे आहे त्यामुळे अनेक वेळा अपघातासारख्या दुर्दैवी घटना शहरांमध्ये घडलेल्या आहेत यापुढेही दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता तहसीलदार केज यांनी स्वतः लक्ष घालून तात्काळ सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन केज नगरपंचायत ला आदेशित करून फलोउत्पादनाच्या (जिरायत खात्याच्या) जागेवर मंगळवारचा आठवडी बाजार भरवण्यात यावा. पाठीमागील १५ ते २० दिवसांपूर्वी मंगळवारच्या दिवशीच आठ दिवसाच्या फरकाने दोन वेळा दोन मोठे अपघात होऊन त्या दोन्हीही अपघातामध्ये दोन नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर सदर अपघातामध्ये २५ ते ३० नागरिक गंभीर स्वरूपाचे जखमी झाले होते. सध्या मंगळवारच्या आठवडी बाजारामुळे नागरिकांच्या जीवितस धोका निर्माण झाला आहे तसेच नागरिकांच्या जीविताचा धोका थांबवण्यासाठी शासनाच्या फलोत्पादनाच्या जागे त आठवडी बाजार भरवणे हे योग्य ठरेल व केजच्या रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही असे लेखी निवेदनात चंद्रकांत खरात सर यांनी म्हटले आहे पुढे निवेदनात खरा सर यांनी म्हटले की, चेस तहसीलदार यांनी मंगळवारच्या आठवडी बाजार प्रकरणी स्वतः लक्ष देऊन तात्काळ सदर बाजार हा फलोउत्पादनाच्या जागे स्थलांतरित करण्यात यावा अन्यथा अन्यथा भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा प्रशासनास इशारा दिला आहे. सदर मागणीचे लेखी निवेदन केज तहसीलचे पेशकर ननवरे यांनी स्वीकारले आहे. लेखी निवेदनाच्या प्रति तहसीलदार केज, जिल्हाधिकारी बीड, नगराध्यक्ष नगरपंचायत केज, मुख्याधिकारी नगरपंचायत केज यांना दिले आहेत.

## वटपौर्णिमेनिमित्त वटवृक्षाची लागवड - शिवाजी विद्यालय, बिटरगाव



रेणापूर /प्रतिनिधी :- १० जून २०२५ रोजी शिवाजी विद्यालय, बिटरगाव (ता. रेणापूर) येथे मा. जिल्हाधिकारी साहेब, लातूर आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी साहेब, जिल्हा परिषद लातूर यांच्या प्रेरणेतून वटपौर्णिमेनिमित्त वटवृक्षाची लागवड करण्यात आली. या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. सूर्यकांत चव्हाण सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि उपस्थित मान्यवरांच्या सहभागातून वटवृक्षाची सामूहिक लागवड करण्यात आली. वटवृक्ष भारतीय संस्कृतीत दीर्घायुष्य, निष्ठा आणि पर्यावरण रक्षणाचे प्रतीक मानला जातो. शाळेतील परिसरात हरित वातावरण तयार करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत सकारात्मक पाऊल ठरले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास शाळेने व्यक्त केला आहे. यावेळी श्री अंकुश शेळके, श्री वसंत यादव ,श्री गौतम जाधव, श्री मल्लिकार्जुन ठोंबरे ,श्री वेणूनाथ यादव ,पद्माकर लकडे ,रमाकांत यशवंत ,श्री तोटावर सर ,गंगाधर इरले ,सत्यवान कांबळे इत्यादी शिक्षक उपस्थित होते

## किशोरवयीन मुलींना व महिलांना मासिक पाळी समुपदेशन

*** लातूर मनपा आरोग्य विभागाचा उपक्रम**

*** ऋदरमहा १० व ११ तारखेला होणार समुपदेशन**

लातूरः- किशोरवयीन मुलींना व महिलांना मासिक पाळी समुपदेशनमासिक पाळी दरम्यान आरोग्यपूर्ण व्यवस्थापनासंबंधी पौगंडावस्थातील मुलींना मूलभूत माहिती व्हावी याकरिता लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून मनपा आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि नागरी आयुष्मान आरोग्य केंद्र अंतर्गत विशेष जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. मुलींमध्ये वाढत्या वयात होणारे शारीरिक बदल, मुख्यत्वे वयाच्या १० ते १४ वर्षा दरम्यान शारीरिक तसेच मानसिक बदलांमधील अवस्था व मासिक पाळी विषयी पौगंडावस्थेतील मुलींना समुपदेशन करणे, व भविष्यातील आरोग्याच्या समस्या कमी करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. मासिक पाळी म्हणजे काय ? मासिक पाळी दरम्यान काय काळजी घ्यावी ? मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या समस्या कशा हाताळाव्यात ?, यासह मासिक पाळी दरम्यान चांगल्या स्वच्छतेच्या सवयी कोणत्या आहेत आणि त्याचे महत्त्व काय आहे हे मुलींना समजावून सांगणे आणि त्यांच्या मनातील मासिक पाळी विषयीच्या शंकांचे निरसन करणे, हे कार्य याद्वारे केले जात आहे. मासिक पाळी विषयीच्या गैरसमजुती किंवा मासिक पाळी दरम्यान योग्य स्वच्छतेच्या सवयी न पाळल्यामुळे होणारे आरोग्याचे दुष्परिणाम टाळणे आणि सदरील कालावधीमध्ये मुलीचे शारीरिक / मानसिक स्वास्थ्य चांगले राहावे असा या उपक्रमाचा उद्देश आहे. आज दिनांक ११ जून २०२५ रोजी महानगरपालिकेच्या एकूण १६ आरोग्य केंद्रांमार्फत हा विशेष उपक्रम राबवण्यात आला आणि यामध्ये एकूण ५४४ मुलींचे समुपदेशन करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदरील उपक्रमामध्ये मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्या मार्गदर्शनाखाली मनपाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपक्रम राबवला आणि यशस्वी केला.

## शैलेश गायकवाड मुंबई विद्यापीठात एमबीए मध्ये सर्वप्रथम.

लातूर :- सिडेनहॅम महाविद्यालय चर्चगेट मुंबई येथून शैलेश श्रीकांत गायकवाड यांनी एमबीएच्या परीक्षेत मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.सिडेनहॅम महाविद्यालय हे आशिया खंडातील सर्वात प्राचीन व प्रतिष्ठित मानले जाते. याच महाविद्यालयात १० नोव्हेंबर १९१८ ते ११ मार्च १९२० या कालावधीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर 'राजकीय अर्थशास्त्र' या विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते, ही बाब अत्यंत प्रेरणादायी ठरते. एमबीएचे शिक्षण घेतल्यास विशेषतः कार्पोरेट सेक्टर मध्ये चांगल्या संधी प्राप्त होतात.



नुकतेच शैलेश ची कॅम्पस प्लेसमेंटद्वारे मुंबई येथील टाटा एआयए लाईफ इन्शुरन्स कंपनीच्या व्यवस्थापन विभागात निवड झाली आहे. माननीय रतन टाटा यांनी अनेकांना रोजगारच नाही तर अगनीत स्वप्ने दिली,त्यांच्या प्रेरणेतून ही कंपनी साकार झाली आहे. देशभरातील ५४००० सल्लागारांना रोजगाराची संधी देणाऱ्या या कंपनीचे नेटवर्क व्यापक व मजबूत आहे. यापूर्वी शैलेशचे बी.टेक.केमिकल इंजीनियरिंगचे शिक्षण आण्णा विद्यापीठ चेन्नई येथून झाले आहे.

## खा.सोनवणेंनी लक्ष घातले अन् चिंचोलीमाळी सबस्टेशनला मिळाले रोहित्र

### सबस्टेशनला मिळाले ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफार्मर



केज/प्रतिनिधी- केज तालुक्यातील चिंचांगली माळी येथील सबस्टेशन येथे ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफार्मर बसविण्याची मागणी शेतकऱ्यांकडून आल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरण विभागाचे मुख्यअंभियता लातूर यांना पत्र लिहले होते. यानंतर दि.९ रोजी याठिकाणी रोहित्र मिळाले असून याबाबत ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

चिंचोली माळी येथे महावितरणचे सबस्टेशन आहे. मात्र, कमी क्षमतेच रोहित्र याठिकाणी असल्याने अनेकदा अडचणीचे ठरत होते. सदरील ठिकाणी ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मिळवून देण्यात यावे, अशी ग्रामस्थ आणि परिसरातील शेतकऱ्यांची मागणी होती. दरम्यान, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरणचे मुख्य अभियंता यांना पत्र देऊन सदरील काम मार्गी लावावे, असे म्हटले होते. यानंतर ५ एमव्हीए अतिरिक्त पॉवर रोहित्रचे काम करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या देण्यात यावा, अशा सुचनाही देण्यात आल्या होत्या. सदरील कामाची प्रशासकिय मान्यता आल्यानंतर परवानग्यांचा विषय समोर आला होता. यातही खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला. यानंतर दि.९ जून रोजी रोहित्र बसविण्यात आले. आता रोहित्र बसविल्याने उच्च दाबाने विद्यूत पुरवठा होणार आहे. शिवाय शेतकऱ्यांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. दरम्यान, खा.सोनवणे यांनी शेतकऱ्यांच्या विषयात बारकाईने लक्ष घालून पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी खासदार सोनवणे यांचे आभार मानले.

# संपादकीय

## न्यायसंस्थेवरील विश्वासासाठी

न्यायाधीशांनी सेवानिवृत्तीनंतर सरकारचे एखादे पद स्वीकारावे का, हा चर्चेचा मुद्दा राहिला आहे. अलीकडच्या काळात अशा अनेक घटना घडल्या आहेत की न्यायाधीशांची निवृत्त झाल्यानंतर मोठ्या पदावर नियुक्ती केली गेली. काहींना संसदेवरही पाठवण्यात आले. मध्यंतरी एका न्यायाधीशांनी निवृत्त झाल्यानंतर लगेचच एका राजकीय पक्षात प्रवेश केला. या असल्या प्रकरणांमुळे न्यायपालिकेशी संबंधित व्यक्तींच्या आचरणाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे. थेट शब्दांत सांगायचे झाल्यास यामुळे न्यायालयांवरचा सर्वसामान्यांचा विश्वास डळमळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हे सांगायचे कारण म्हणजे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनीच यासंदर्भात व्यक्त केलेली भूमिका. केवळ न्यायपालिकेतील व्यक्तींनाच नव्हे, तर त्यांच्या अनुभवाचा अथवा अन्य कोणत्या ज्ञानाचा लाभ घेऊ पाहणार्या राजकीय पक्षांना अथवा सरकारलाही याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. सरन्यायाधीश गवई यांनी ब्रिटनमध्ये भाष्य केले आहे. निवृत्तीनंतर न्यायाधीशांनी एखादे सरकारी पद स्वीकारणे अथवा निवडणुकीच्या रिंगणातच उतरणे याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. न्यायाधीश मंडळी जर अगोदरच भविष्यातील राजकीय लाभाचा किंवा सरकारी फायद्याचा विचार करत असतील तर न्यायाधीश म्हणून कार्यरत असताना त्यांच्या निर्णयावर या बाबीचा प्रभाव नक्कीच पडू शकतो. पडतो किंवा नाही पडत हा नंतरचा भाग.

किमान तसा समज निर्माण होण्याची अथवा आभास निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही असेच गवई यांना सूचित करायचे आहे. जेव्हा अशा घटना घडतात तेव्हा त्याकडे सगळ्यांचे लक्ष वेधले जाणे स्वाभाविक ठरते आणि त्याची चर्चाही सुरू होते. एका व्यक्तीच्या कृतीमुळे संपूर्ण न्यायालयाची विश्वासार्हता यामुळे पणाला लागते कारण प्रत्येक कृतीचा अन्वयार्थ लावला जात असतो. राजकीय व्यवस्थेबाबत भारतात असंख्य मतप्रवाह आहेत. कोणाला यंत्रणा स्वच्छ वाटते किंवा त्यातील चांगले अथवा सकारात्मक काय आहे तेवढेच पाहावे आणि ते स्वीकारावे असा काहींचा कल असतो.

तथापि, अशी विचारदृष्टी असणार्यांची संख्या अत्यंत नगण्य आहे. बहुतांश लोक राजकीय व्यवस्थेकडे नकारात्मक भावातूनच पाहत असतात. याउलट न्यायपालिकेकडे आदराने आणि विश्वासाने पाहिले जात असते. तिच्या स्वातंत्र्याबद्दल आणि निष्पक्षतेबद्दल शंका घेतली जात नाही. असे असल्यावर स्वत:ला कायम स्वच्छ आणि पारदर्शी ठेवण्याची जबाबदारी त्या यंत्रणेचीच असते. तसे न होता शंका निर्माण करणारी एखादी घटना घडली की त्यामुळे संपूर्ण यंत्रणाच वादाच्या भोवर्यात सापडते आणि तिच्यावरच्या विश्वासाला तडा जातो.


न्यायाधीशांनी अशी निवृत्तीनंतरची नियुक्ती स्वीकारूच नये यासाठी वकिलांच्याच एका संघटनेने मागे एक याचिका दाखल केली होती. निवृत्तीनंतर न्यायाधीशांनी किमान दोन वर्ष कोणते सरकारी पद स्वीकारू नये असे बंधन असले पाहिजे अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र ही बाब न्यायालयांच्या अधिकार क्षेत्रात येत नाही अशी टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयानेच ती मागणी अमान्य केली होती. याचा अर्थ न्यायपालिका नियमांनुसार जर गेली तर ती असे प्रकार थांबवू शकत नाही. त्यामुळे येथे किती काळ थांबायचे आणि नंतर कोणती नियुक्ती स्वीकारायची किंवा नाही स्वीकारायची हा निर्णय ज्या त्या व्यक्तीच्या नैतिकतेवर आणि त्याच्या गरजेवर अवलंबून असतो.

त्यांनी निवृत्तीनंतर काम केले पाहिजे अशी भूमिका मांडणारे अनेक आहेत. न्यायाधीशांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा राजकारणात अथवा त्यांची नियुक्ती झालेल्या अन्य पदाला फायदाच होईल असा तर्क त्यामागे असतो. तोही नाकारता येत नाही. त्याचे कारण आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत न्यायाधीशांनी विविध क्षेत्रांतील असंख्य प्रकरणे हाताळली असतात आणि त्यांचा निवाडा करण्यापूर्वी त्याचा सखोल अभ्यास व त्यावर चिंतनही केले असते. ही त्यांची ज्ञानाची शिदोरी केवळ ते निवृत्त झाले आहेत व त्यामुळे त्यांनी काम करणे संयुक्तिक ठरणार नाही या एका तर्काच्या आधारावर गरजूंना उपलब्ध होऊ शकत नाही.

सेवानिवृत्त व्यक्ती कायद्याचा सिद्धांत आणि न्यायप्रक्रियेबद्दल असलेले आकलन यामुळे धोरण ठरवताना सरकारमध्ये योगदान देऊ शकतात. तद्वतच न्यायाधीश त्यांच्या कार्यकाळात त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या प्रामाणिकपणाच्या जबाबदारीचे निर्विवाद निर्वहन करत असतात. अशी व्यक्ती ज्यावेळी अन्य पद भूषवते त्यावेळी त्या पदालाही एक नैतिक अधिष्ठान प्राप्त होते आणि त्या पदाची प्रतिष्ठा तसेच विश्वासार्हताही वाढते. आपल्या देशात किंवा अन्यत्रही ज्या गोष्टी लिखित स्वरूपात स्वीकारल्या गेल्या त्या सगळ्या उच्च नीतिमूल्याचे आचरण अपेक्षित धरून स्वीकारल्या गेल्या. केवळ न्यायपालिकाच नाही तर राज्यांची विधीमंडळे, संसद आणि अन्य सगळ्याच ठिकाणी ते लागू होते. प्रत्यक्षात आज स्थिती काय आहे ते दुर्लक्षून चालणार नाही. अपेक्षित नैतिक आचरणाला कधीच तिलांजली दिली गेली आहे. चुकीच्या बाबींचे कायद्याचाच आधार घेत समर्थन करण्याचाही शिष्टाचार रूढ झाला आहे. या पार्श्वभूमीवर विचार केला तर न्यायाधीशांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारत निवडणुकीच्या रिंगणात उतरणे अथवा निवृत्तीनंतर एखाद्या आयोगाचे अध्यक्षपद स्वीकारणे किंवा संसदेच्या वरिष्ठ सभागृहात जाऊन बसणे आदींचा पायंडाच जर पडला तर न्यायालयांनी भविष्यात केलेले कोणतेही निवाडे संशयापासून अलिप्त राहू शकणार नाहीत.

# आताची जातगणना!

भारतातील जातीचे राजकारण एवढे तीव्र आणि आक्रमक झाले आहे की ही जातगणना फार जपून, अनेक खबरदारी घेत पूर्ण केली पाहिजे. ४ जून रोजी केंद्र सरकारने जाहीर केल्यानुसार गेली अनेक वर्षे वादग्रस्त ठरलेली जातगणना दोन टप्प्यांत करण्यात येणार आहे. यातील पहिला टप्पा पुढच्या वर्षी आक्टोबर २०२६ मध्ये तर दुसरा टप्पा मार्च २०२७ मध्ये सुरू होणार आहे. आपल्या देशात अशी जातगणना तब्बल ९३ वर्षांनी होणार आहे. याआधी अशी जातगणना १९३१ साली झाली होती. त्यानंतर १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यामुळे १९४१ साली इंग्रज सरकार येथे जनगणना करू शकले नाही. प्रजासत्ताक भारतातील नेत्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार भारतातील जाती व्यवस्था नष्ट करायची होती. असे ध्येय असल्यावर जातगणना करणे इष्ट ठरणार नाही, म्हणत भारत सरकारने १९५१ सालच्या जनगणनेपासून जातगणना करणे बंद केले होते. आता पुन्हा एकदा जातगणना होणार आहे.



सरकारने दिलेल्या माहितीनुसार पुढच्या वर्षी होत असलेली जातगणना देशातील छोट्या राज्यांत आधी होईल. पहिल्या टप्प्यात जम्मू--काश्मीर, लडाख हे केंद्रशासित प्रदेश आणि हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांत केली जाईल. देशाच्या उर्वरित भागात २०२७ साली जातगणना सुरू होईल. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या आणि राजकीयदृष्ट्या हे फार महत्त्वाचे पाऊल आहे. तसं पाहिलं तर यापूर्वी २०११ साली डॉ. मनमोहन सिंग सरकारने या दृष्टीने काही पावलं टाकली होती. पण त्या आकडेवारीत फार त्रुटी होत्या वगैरे आक्षेपांमुळे त्यातली आकडेवारी समाजासमोर आली नाही.

काँग्रेस वगैरे विरोधी पक्षं जातगणनेची मागणी करत होते तर सत्तारूढ भाजपा याला नकार देत होता. आता याबद्दलचे वाद मागे पडले असून जातगणनेचा मार्ग सूकर झाला आहे. याचे स्वागत केले पाहिजे. असे असले तरी जातगणना एवढी वादग्रस्त का झाली, ती भारतात कधी सुरू झाली, मधल्या काळात काय काय घडले वगैरे समजून घेणे गरजेचे आहे.

युरोपातील देशांसारखा भारत कधीही एकजिनसी देश नव्हता. युरोपातील अनेक देश आजही 'एक धर्म- एक भाषा' असे आहेत. हजारो वर्षांपासून भारत हा बहुभाषिक, बहुधार्मिक देश म्हणून ओळखला जात आहे. भारताची आणखी एक ओळख म्हणजे येथील जातीव्यवस्था. जातीव्यवस्था फक्त एक व्यवस्था नव्हती तर यात अनेक प्रकारचे शोषण दडलेले होते. म्हणूनच महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी वगैरे महानुभवांनी जातीव्यवस्था नष्ट करण्याचे प्रयत्न केले. याचा एक भाग म्हणून प्रजासत्ताक भारतात जातगणना बंद केली होती. आता पुन्हा सुरू होत आहे.

आपल्या देशातील जातव्यवस्था गुंतागुंतीची जशी आहे तशीच कमालीची वादग्रस्तसुद्धा आहे. १९३१ साली झालेल्या शेवटच्या जातगणनेच्या वेळीसुद्धा वादावादी झाली होतीच. तीच वादावादी आतासुद्धा सुरू आहे. १९३१ साली ब्रिटीश भारताचे जनगणना आयुक्त होते जॉन हेन्री हटन. या आयसीएस अधिका-र्याने यासंदर्भात सुमारे सहाशे पानी अहवाल बनवला होता. त्याकाळी भारताची लोकसंख्या म्हणजे जगाच्या एकूण लोकसंख्येचा सहावा भाग. यातील काही प्रांतांत दाट लोकसंख्या होती तर काही प्रांतांत अतिशय विरळ. तेव्हाच्या भारताची सरहद्द बलुचिस्तानपासून म्यानमारपर्यंत पसरली होती. बलुचिस्तानात तेव्हासुद्धा लोकसंख्या दूरदूर पसरली होती.

एका अंदाजानुसार जनगणनेबद्दल माहिती गोळा करणार्या एका सरकारी कर्मचार्याकडे सुमारे आठशे चौरस मैल एवढ्या भागाची जबाबदारी होती. ही एक बाब. दुसरी तितकीच महत्त्वाची बाब म्हणजे १९३१ च्या दरम्यान भारतीय जनतेत स्वातंत्र्याबद्दल बरीच जागृती झालेली होती. एका बाजूला महात्मा गांधींचा मिठाचा सत्याग्रह जोरात होता तर दुसरीकडे इंग्रज सरकार जनगणनेची तयारी करत होते.

सरकारने या जनगणनेची घोषणा २७ फेब्रुवारी १९३१ रोजी झाली आणि आठवड्याभरात म्हणजे ५ मार्च १९३१ रोजी गांधी--आयर्विन करार झाला. या करारामुळे मिठाची चळवळ मागे घेण्यात आली. एक धोरण म्हणून काँग्रेसने या जनगणनेवर बहिष्कार टाकला होता. यासाठी पक्षातर्फे ११ जानेवारी १९३१ रोजी 'काळा दिवस' साजरा करण्यात आला होता. मात्र सरकारी अहवालानुसार याचा समाजावर फारसा परिणाम झाला नाही. गुजरातमधील अहमदाबाद, सुरत वगैरेसारखी शहरं आणि मुंबईतील घाटकोपर आणि पार्ले या सारख्या उपनगरांत मात्र प्रभाव होता. १९३१ सालच्या जनगणनेसमोर खरे आव्हान होते जागतिक मंदीचे.

म्हणून आयुक्त हटन साहेबांना फार काटकसर करावी लागली. या जनगणनेसमोर भारतीय समाजातील रूढी परंपरांचे आव्हान होतेच. म्हणजे काही जमातींनी त्यांच्या घरांवर सरकारी नोकरांना आकडे लिहू दिले नाही. असं करणं अशुभ समजलं जात होतं. दुर्गम भागात गेलेल्या सरकारी नोकरांवर जंगली श्वापदांनी जीवघेणे हल्ले केल्याचीही उदाहरणं आहेत. असे सर्व अडथळे पार करत १९३१ची अतिशय महत्त्वाची जनगणना पार पडली. या जनगणनेचे एक महत्त्व म्हणजे फाळणीपूर्वी झालेली ही शेवटची जनगणना.

या जनगणनेसाठी ब्रिटीशांच्या ताब्यातील भारत आणि संस्थानिकांच्या ताब्यातील भारतात फिरून लोकसंख्येबद्दल माहिती गोळा केली. त्यानुसार तेव्हाच्या भारताची लोकसंख्या ३५.०५ कोटी एवढी होती. हीच लोकसंख्या १९२१ सालच्या जनगणनेनुसार ३१.८९ कोटी होती. म्हणजे दहा वर्षांत देशाची लोकसंख्या १०.६ टक्क्यांनी वाढली होती. जनगणना अहवाल फक्त लोकसंख्येची माहिती देत नाही तर लोकांबद्दल अनेक प्रकारची माहिती देतो. आयुक्त हटन यांनी नमूद केले होते की आता भारतीयांच्या राहणीमानात लक्षणीय प्रगती झाली आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारली आहे.

भारतात जवळपास प्रत्येक व्यक्ती लग्न करत असल्यामुळे युरोपपेक्षा भारताची लोकसंख्या वाढत आहे. ही अवाढव्य लोकसंख्या देशाच्या सर्व भागात सारख्या प्रमाणात पसरलेली नव्हती. बलुचिस्तान वगैरेसारख्या भागात लोकसंख्या अगदी विरळ होती. कोचिनसारख्या राज्यात लोकसंख्या दाट होती. हटन साहेबांनी याची कारणंसुद्धा नोंदवून ठेवली आहेत. त्यांच्या निरीक्षणानुसार हा प्रकार शेती व्यवसायामुळे ठरतो. ज्या भागातील शेती सुपीक आहे तेथे लोकसंख्या दाट असते. असे युरोपात उद्योग व्यवसायांमुळे होते.

भारत अतिशय गुंतागुंतीचा देश आहे. येथे अनेक धर्म आणि त्यातले पंथ यांचा प्रभाव दिसून येतो. १९३१ साली आणि त्या आधी केलेल्या जातगणनेत पंजाब प्रांतात वेगळीच समस्या समोर येत असे. ती म्हणजे या भागात असलेला आर्य समाजाचा प्रभाव.त्यामुळे अनेक लोक स्वतः ची जात सांगत नसत. १९३१ सालच्या जातगणनेत सरकारतर्फे लोकांना अठरा प्रश्न विचारले जात. यातील आठ प्रश्न धर्म, वंश, जमात वगैरेंबद्दल असायचे. हे तपशील लक्षात घेतले म्हणजे पुढच्या वर्षी सुरू होत असलेल्या जातगणनेसमोर कोणत्या समस्या येतील याचा अंदाज येतो.

# दखल : डाय हार्ड फॅन्स

सेलिब्रेटींना पाहण्यासाठी त्यांचे 'डाय हार्ड फॅन्स' म्हणजेच चाहते हे कमालीचे उतावळे झालेले असतात. त्यामुळेच चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरीची भयावह घटना घडली. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)च्या १८व्या पर्वाची नुकतीच सांगता झाली. यंदा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएल विजेतेपद पटकावले. मात्र, त्याच वेळी या विजयाच्या आनंदावर विरजण टाकणारी एक भयावह घटना घडली. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या गर्दीत चेंगराचेंगरी होऊन अकरा लोकांना आपला जीव गमवावा लागला. या घटनेने पुन्हा एकदा आपल्या देशातील अपुर्या आणि बेशिस्त गर्दी नियंत्रण व्यवस्थेतील गंभीर उणिवा समोर आणल्या आहेत. त्याचबरोबर गर्दीमध्ये शिरल्यानंतर विवेकाचे भान हरपत जाणार्या लोकमानसिकतेचे दर्शनही यानिमित्ताने पुन्हा एकदा घडले आहे. सध्याच्या सोशल मीडियाच्या काळात सेलिब्रेटींना मोबाइल कॅमेर्यात कैद करण्यासाठी, त्यांच्यासोबत सेल्फी काढण्यासाठी किंवा ते उपस्थित असलेल्या ठिकाणची गर्दी टिपण्यासाठी चाहत्यांमध्ये अक्षरशः आसुसलेपण दिसून येते.




बंगळुरूमधील दुर्घटना घडण्याच्या आधी पुण्यातील एका मॉलमध्ये अभिनेता अक्षयकुमारच्या 'हाऊसफुल ५' च्या प्रमोशनचे आयोजन करण्यात आले होते. मॉलच्या सर्व मजल्यांवर आणि गॅलर्यांमध्ये लोकांनी या चित्रपटातील कलाकारांना बघण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. यामुळे चेंगराचेंगरीसारखी स्थिती निर्माण झाली. महिलांचा आणि लहान मुलांचा रडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. या प्रसंगाचे गांभीर्य ओळखत अक्षय कुमारने तात्काळ माइकवरून हात जोडून सर्व लोकांना शांत राहण्याचे आणि ढकलाढकली टाळण्याचे आवाहन केले. एक लहान मुलीची तिच्या आई-बाबांपासून चुकामुक झाल्याचे लक्षात आल्यानंतर जॅकलीन फ़र्नांडिस आणि सोनम बाजवा यांनी त्या मुलीला शांत केले आणि तिच्या पालकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा सोशल मीडियावर व्हायरल होणारा व्हिडिओ पाहिला असता सेलिब्रेटींच्या प्रेमापोटी माणसे कशी वेडी होताहेत आणि भान हरपत आहेत, हे लक्षात येते. मागील काळात 'पुष्पा २'च्या प्रीमियरच्या वेळीही असाच प्रकार घडला होता. त्यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये एका महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती.

बंगळुरूमधील गर्दीचे मुख्य आकर्षण होते टीम इंडियाचा तडाखेबंद फलंदाज विराट कोहली आणि त्याची पत्नी सिनेअभिनेत्री अनुष्का शर्मा. या जोडगोळीला पाहण्यासाठी आणि रॉयल चॅलेंजर्सच्या या ऐतिहासिक विजयाचे सेलिब्रेशन करण्यासाठी समर्थकांची, बघ्यांची, चाहत्यांची प्रचंड गर्दी स्टेडियमबाहेर जमली होती. एवढ्या मोठ्या गर्दीचा अंदाज आयोजकांना नव्हता. स्टेडियमची क्षमता सुमारे ३५ हजार असून प्रत्यक्षात २ ते ३ लाख लोक कार्यक्रमस्थळी आले असतील तर अशा प्रकारची दुर्घटना घडण्याचा धोका वाढतो, हे आज सामान्य माणूसही सांगू शकेल.

मुळात बंगळुरूमध्ये घडलेली दुर्घटना हे चेंगराचेंगरीचे पहिले प्रकरण नाही. उलट गेल्या पाच वर्षांमध्ये सातत्याने अशा घटना घडत आहेत. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे पार पडलेल्या महाकुंभानंतर रेल्वेस्थानकावर झालेली चेंगराचेंगरी असो किंवा याच उत्तर प्रदेशातील एका तथाकथित बाबाच्या अध्यात्मिक सत्संगादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये झालेला भक्तांचा मृत्यू असो किंवा अगदी काही आठवड्यांपूर्वी गोव्यामध्ये झालेली चेंगराचेंगरी असो; या सर्वांच्या मुळाशी समान कारणे असतात. एक म्हणजे अशा कार्यक्रमांचे आयोजन करणार्यांचा बेफिकिरपणा, दुसरे म्हणजे गर्दीनियंत्रणाची जबाबदारी असणार्या यंत्रणांचा किंवा व्यवस्थापनाचा हलगर्जीपणा आणि तिसरे म्हणजे प्रशासनाचे किंवा पोलिसांचे सर्व आदेश पायदळी तुडवून वेडेपिसे होऊन जल्लोष करणारे किंवा तारतम्य हरपून बसलेले नागरिक. दुर्दैवाची बाब म्हणजे असंख्य दुर्घटना घडूनही या तिन्ही घटकांमध्ये तसूभरही फरक पडत नाही.

दरवेळी अशा चेंगराचेंगरीनंतर व्यवस्थेला, शासनाला, प्रशासनाला, पोलिसांना दोष देऊन त्यांच्याकडे बोट दाखवताना अशा कार्यक्रमांना जाणार्या नागरिकांनीही सुजाणपणाचे दर्शन घडवणे अपेक्षित आणि आवश्यकच असते. बंगळुरूच्या दुर्घटनेमध्ये पोलिसांकडून गर्दीला पांगवण्यासाठी आवाहन केले जात होते; पण आपल्या लाडक्या क्रिकेटपटूंना पाहण्याच्या वेडापायी आतूर झालेले चाहते त्या आवाहनाकडे ढुंकूनही पाहण्यास तयार नव्हते. ही स्थिती सर्वदूर दिसून येते. याचे कारण गर्दीत व्यक्तींची बुद्धी आणि निर्णयशक्ती मंदावते. त्याऐवजी समूहभावना निर्माण होते, जिच्यावर तात्काळ प्रतिक्रिया, अफ़वा आणि भावनाविवशता सहजगत्या प्रभाव टाकते. त्यामुळेच एखादी अफ़वा (जसे की गेटवर मोफ़त प्रवेश आहे) संपूर्ण नियंत्रण मोडून टाकू शकते. त्यामुळे आयोजक आणि प्रशासनाने दक्ष राहणे गरजेचे असते.

सततच्या या घटना रोखण्यासाठी लोकप्रबोधनाबरोबरच राज्य शासनांनी पब्लिक इव्हेंट मॅनेजमेंट गाइडलाइन्स तयार करणे आवश्यक आहे. तामिळनाडूमध्ये २०११ नंतर अशा मार्गदर्शक तत्त्वांचे नियम बनवण्यात आले आहेत. पण अशा दुर्घटना भविष्यात घडू नयेत यासाठी स्वतंत्र गर्दी व्यवस्थापन युनिट प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करणे, सर्व सार्वजनिक कार्यक्रमांना पूर्व परवानगी आणि 'रिस्क ऑडिट' सक्तीची करणे, प्रशिक्षित स्वयंसेवक दल तयार करणे (एनसीसी, स्काउटचा उपयोग), गर्दीची सूचना देणारे मोबाइल ॲप तयार करणे, प्रत्येक मोठी स्टेडियम, मंदिर, रेल्वे स्थानकात नियमित इमर्जन्सी ड्रील करणे यांसारख्या उपाययोजना आवश्यक आहे. सार्वजनिक सुरक्षेचा पाया हा व्यवस्थापनात आहे. या व्यवस्थापनामध्ये समाजशास्त्र, मानसशास्त्र, तंत्रज्ञान, प्रशासन आणि कायदा या सर्वांचा समन्वय आवश्यक असतो. प्रत्येक घटना, अपघात किंवा शोकांतिका हे हेच शिकवत असतात. पण आपण त्यातून बोधच घेत नाही.

# हनमंत जाकते (अंकल) यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य,वृक्षारोपण, फळे, शासकीय रुग्णालय,लातूर येथे अन्न वाटप करून जयंती साजरी





लातूर :- १० जून रोजी माझं घर या संस्थेच्या ठिकाणी वांगजेवाडी ता.औसा येथे माजी नगरसेवक कालकथित हनमंत जाकते (अंकल )यांच्या जयंतीनिमित्त माझं घर वंचित व बेघर मुलांना शालेय साहित्य,फळे व अन्नदान करून वृक्षारोपण करण्यात आले.

हनमंतजी जाकते (अंकल) यांचे सामाजिक,शैक्षणिक राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य,गोरगरीबाचे कैवारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्याकडे कोणीही मदतीसाठी गेले तर त्यांना निस्वार्थ मदत करत होते. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी हनमंतजी जाकते यांचे चिरंजीव विनय जाकते,जाकते परिवार व मित्र परिवारांच्या वतीने त्यांची जयंती साजरी करण्यात आली.त्यांच्या समाजसेवेचा वसा पुढे चालू ठेवण्यासाठी इथून पुढे हनमंत जाकते (अंकल) फाउंडेशनच्या माध्यमातून आणखीन समाजउपयोगी उपक्रम साजरे करणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास अनेक संघटना विविध पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी भिमराज युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनय जाकते, लोकप्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अजय सुर्यवंशी,गोविंद काका पारिख,दलीत पँथर नेते दिलीपमामा गायकवाड, भा.ज.पा.चे मधुसुदन पारिख,ड. विजय अवचारे, प्रा.सुधीर साळुंके सर, ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे सचिव दयानंद एरंडे,कपिल शेवाळे सर,भिम आर्मीचे विनोद कोल्हे,अकाल सेनेचे गुलजितसिंग जुन्नी,शिवसेनेचे सुनील फुलारी,बबलु जाकते ग्रुपचे अध्यक्ष बबलु जाकते, प्रज्वल उबाळे,लक्ष्मण अंकुशे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे डी.उमाकांत,बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ सुर्यवंशी भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस आकाश बजाज,राजकिरण बिडवे,योगेश पल्ले, शंकर नाभुजंगे,प्रतीक पुकाळे,विक्रांत जाकते,राम नागदे, सोनू कांबळे,अनिकेत कांबळे यांच्यासह माझं घर परिवाराचे आधारस्तंभ प्रा.शरद झरे व अन्य सदस्य उपस्थित होते.

# आ. कराड यांच्या संवाद संपर्क कार्यालयास माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांची सदिच्छा भेट




लातूर :- रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष राज्याचे कृषी, फलोत्पादन पणन माजी राज्यमंत्री आ. सदाभाऊ खोत यांनी सोमवारी दुपारी भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या संवाद या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी माजी राज्यमंत्री आ. सदाभाऊ खोत यांचा श्री पांडुरंगाची मूर्ती भेट देऊन यथोचित सत्कार केला स्वागत केले. यावेळी दोन्ही नेत्यात राज्यातील राजकीय विविध विषयावर आणि मतदार संघातील विकास कामाबाबत सविस्तर चर्चा झाली.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, रयत क्रांती संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष दीपक भोसले, प्रदेश उपाध्यक्ष राहुल मोरे, मराठवाडा विभाग अध्यक्ष शिवाजीराव पेठ येथे भीमरावअण्णा माने बीड जिल्हाध्यक्ष नागेश मस्के, दीपक वाहुळे, अमोल वेदपाठक यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे उद्धव काळे, सुरज शिंदे, हनुमंत बापू नागटिळक, गोपाळ पाटील, श्याम वाघमारे, आदिनाथ मुळे, बालाजी शिंदे, अनंत कणसे, अशोक सावंत, सतिष कात्रे, धनराज शिंदे, संतोष चव्हाण, सिद्धेश्वर मामडगे, ज्ञानेश्वर जुगल, लताताई भोसले, सुरेखा पुरी, महेश कणसे, बालासाहेब कदम, शुभम खोसे, शरद शिंदे, लिबराज बोळंगे यांच्यासह अनेक जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चांगल्या ज्ञानातून चांगल्या विचारांचा उगम होत असतो..! – समाजभूषण उत्तमराव तरकसे



नवी मुंबई वाशी:- कोपरखैरणे येथील ज्ञान विकास शिक्षण संस्थेच्या ज्ञानविकास सभागृहात रंग धनु प्रकाशन नवरंग साहित्य सांस्कृतिक आणि कला मंडळ नवी मुंबई यांच्या वतीने साहित्यिक गजानन म्हात्रे यांच्या ६१ व्या प्रकटदिनानिमित्त २ रे रंगधनु नवरंग एकदिवसीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री संदीपजी नाईक (मा आमदार ऐरोली मतदारसंघ), संमेलन अध्यक्ष श्री एल बी पाटील (ज्येष्ठ साहित्यिक), स्वागत अध्यक्ष एड. पी सी पाटील (ज्येष्ठ सामाजिक नेते), तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सौ.गोडबोले (ज्येष्ठ साहित्यिका), श्री अविनाश पाटील (साहित्यिक), श्री देविदास पोटे (साहित्यिक), श्री रविकिरण पाटील, श्री काशिनाथ मडवी (ज्येष्ठ साहित्यिक), व विशेष अतिथी म्हणून समाजभूषण मा. श्री उत्तमराव दासु तरकसे असारडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित – ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत) हे विचार मंच्यावर उपस्थित होते सदर काव्यसमेलना दरम्यान परिसंवादामध्ये आजच्या पुस्तकाची दिशा व दशा या विषयावर परिसंवादात उत्तम तरकसे यांनी आपले विचार मांडताना साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून वास्तवादी परिवर्तनवादी साहित्याची निर्मिती करावी कारण चांगल्या ज्ञानातून चांगल्या विचाराचा उगम होत असतो म्हणून दर्जे दार साहित्य निर्मिती व्हावी असे साहित्यिकांना आव्हान करत वाचक वर्ग समाज माध्यमांमुळे घटला आहे ही खंत सुद्धा व्यक्त केली तसेच सदर विषयावर अनेक साहित्यिकाने सुद्धा आपले विचार मांडले, सदर काव्यसमेलनात सकाळी ग्रंथ दिंडी दीप प्रज्वलन मान्यवरांचे स्वागत समारंभ गितातून तसेच पुस्तक प्रकाशानाचा कार्यक्रम घेऊन दुपारचे सिन्हभोजना नंतर परिसंवादाचा कार्यक्रम काव्य संमेलन घेण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री महेंद्र कोंडे (मुख्य जनसंपर्क अधिकारी नवी मुंबई म न पा) यांनी खूप सुंदर प्रकारे केले तसेच सर्व उपस्थितितांचे आभार श्री परुळेकर व साहित्य गजानन म्हात्रे यांनी केले.

# कंत्राटी सफाई कामगारांचे काम बंद आंदोलन यशस्वी

## राजकुमार होळीकर यांच्या नेतृत्वात आंदोलन

### किमान वेतन, पी. एफ. व सुरक्षा साधने, सुट्ट्या, रजा, बोनसची मागण्या मंजूर





लातूर :- महानगरपालिका अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन, पी. एफ., सुरक्षेची साधने, सुट्टया व रजा मिळाव्यात यासाठी आठ महिन्यापासून प्रलंबित असलेल्या मागण्यासाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांच्या नेतृत्वाखाली

आज १० जून रोजी काम बंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल तात्काळ मनपा आयुक्त देविदास जाधव यांनी घेतली. सफाई कामगारांच्या शिष्ठ मंडळाला बोलावून त्यांच्याशी चर्चा केली आणि १५ दिवसाच्या आत त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यावेळी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर, भटक्या विमुक्तांचे नेते प्रा. सुधीर अनवले, लेबर युनियचे नेते डॉ. सुधीर देशमुख, शेकापचे नेते उदय गवारे, अखिल कामगार जनरल संघटनेचे शहराध्यक्ष विशाल काळे, ज्योती उपाडे, लहू जगताप, परमेश्वर कांबळे, महेंद्र कांबळे, सुधीर कांबळे, अय्युब शेख, ईश्वर काळे, सुनील सगट, सचिन काळे, अंजनाताई सगट, अभिजित बनसोडे, कुमार कांबळे, अमोल शिंदे, रोहित कांबळे, अन्तेश्वर सगट, अंगद बनसोडे, सूर्यकुमार गायकवाड, ईश्वर कासारे, विनोद मोरे, पवन लांडगे, सचिन देसाई, रमाकांत शिंदे, अमोल अडसूळ आदिसह अनेक कामगार पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

आज सकाळी साडे दहा वाजल्यापासून मनपाच्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी सर्व वाहने, घंटागाड्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर लावून काम बंद केले. एकही सफाई कर्मचारी कामावर गेला नाही. त्यामुळे लातूर शहरातील सफाईचे, शहर स्वछतेचे काम बंद होते. सफाई कामगारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून आंदोलनाला सुरुवात केली. मानपासमोर कामगारांनी प्रचंड घोषणाबाजी केली. त्यानंतर मनपा आयुक्तानी कामगारांच्या शिष्ठ मंडळास चर्चे साठी बोलावले. आणि चर्चा झाल्यानंतर सफाई कामगारांच्या मागण्या येत्या १५ दिवसात पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन आयुक्तानी दिले.

# सातव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेचे राज्यव्यापी आंदोलन..

**महाराष्ट्रातील परिचारिका संवर्गाचे उच्च पदे जसे अधीसेविका, सहाय्यक अधीसेविका खूप दिवसापासून रिक्त आहेत. परिचर्या महाविद्यालयाचे प्राचार्य व उप- प्राचार्य ही पदेही शासनाने आजतागायत भरलेलीच नाहीत. उच्चपदे रिक्त ठेवने किंवा न भरणे म्हणजे त्या संवर्गावर अन्याय नाही का?**
**परिचारिका संवर्गातील उच्च पदे शासनाने त्वरित भरावीत.**
**------------**
**भीमराव चक्रेराज्य उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर.**

**लातूर येथील परिचर्या महाविद्यालयात २००० पासून कार्यान्वित असुन आजतागायत शासनाने येथील परिचर्या शिक्षकांची पदनिर्मिती केली नाही तसेच सध्याघडीला इरीळल ईल नर्सिंग चा शासनाकडून शासन आदेश निघालेला असुन या वर्षापासून सुरु करण्याची तयारी झाली आहे तरी या कोर्स साठी पण आजतागायत पदनिर्मिती केलेली नाही. तरी पदनिर्मिती लवकरात लवकर मंजूर केली पाहिजे.**
**----------**
**श्री राम सुर्यवंशी राज्यखजिनदार महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, मुख्यालय लातूर**

**परिचारीकांची कंत्राटी भरती ही अत्यंत अन्यायकारक बाब असून २०२२ मध्ये बेमुदत आंदोलनानंतर ती रद्द करण्यात आली होती. यासाठी पुन्हा काम बंद आंदोलन करणे हाच उपाय आहे.**
**------------**
**श्री पांडुरंग गव्हाणे**
**राज्य कार्यकारिणी सदस्य**
**महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, मुख्यालय लातूर**

**सार्वजनिक आरोग्य विभागातील प्रशासकीय बदली ही अन्यायकारक असून यामुळे अनेक कुटुंब विस्कळीत झाली तर अनेकांचा अपघाती मृत्यू ही झाला आहे. प्रशासकीय बदली रद्द करुन विनंती व तक्रार आधारित बदली झाली पाहिजे.**
**----------**
**श्री सुनिल कुंटे**
**उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, सा. आ.विभाग मुख्यालय लातूर**

**पाठ्यनिर्देशिका पदाच्या वेतन त्रुटीवर अद्याप तोडगा नाही**
**मा. बक्षी व मा. खुल्लर समित्यांच्या शिफारसी नंतर सुद्धा पाठ्यनिर्देशिका या पदाच्या वेतन त्रुटीचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. समकक्ष पदे व पदोन्नतीच्या साखळीतील खालील तज्ञ परिचारिका पदांना वेतन वाढ मिळालेली असताना पाठ्यनिर्देशिका पदास अन्यायकारकरीत्या दुर्लक्षित करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासकीय संरचनेत असमतोल निर्माण होण्याची शक्यता आहे. शासनाने समितीने केलेल्या प्रशासकीय शिफारशींचा आधार घेऊन आमची वेतन त्रुटी लवकर दूर करावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन करण्याशिवाय आम्हाला पर्याय राहणार नाही.**
**---------**
**श्री. श्रीधर नवनाथ भांगे राज्य सह सचिव**
**असोसिएशन ऑफ नर्सिंग टीचर्स इन महाराष्ट्र.**

लातूर :- राज्यात सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी २०१७ साली बक्षी सामिती गठित करण्यात आली. बक्षी समितीसमोर महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर संघटनेनी राज्यातील परिचारिका संवर्गातील सर्व स्तरावरील पदाच्या मागण्या संदर्भासहित सादर केल्या. त्यानंतर एप्रिल २०१९ ला बक्षी समितीच्या शिफारसी नुसार १ जाने २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला. त्यात असलेल्या त्रुटी निवारणासाठी मार्च २०२३ मध्ये बक्षी समितीचा खंड २ जाहीर करण्यात आला होता. या खंड २ मध्ये परिचारिका संवर्गाच्या वेतन त्रुटीचे निराकरण होणे अपेक्षित असताना, पुन्हा खंड २ मध्ये सुद्धा अधिपरिचारिका, परिसेविका, पाठयनिर्देशिका तसेच सार्वजनिक आरोग्य विभागातील बालरोग परिचारिका या पदावरील अन्याय दूर झाला नाही. समकक्ष पदांचा सुधारित वेतनश्रेणी लागू झाल्या परंतु काही पदावर अन्याय कायम राहीला. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या वतीने प्रशासकीय विभाग व शासनाच्या या बाबी लक्षात आणून दिल्या. तसेच, न्यायालयात ही दाद मागितली. विविध संघटनांच्या न्यायालयीन प्रकरणामुळे शासनाने पुन्हा वेतन त्रुटी निवारणासाठी मा. मुकेश खुल्लरसाहेबयांच्याअध्यक्षतेखाली खुल्लर समिती गठित केली.

या समिती पुढे सुद्धा संघटनेच्या वतीने वेतन त्रुटी निवारणास्तव सादरीकरण करण्यात आले. परंतु पुन्हा एकदा अधिपरिचारिका, परिसेविका, पाठयनिर्देशिका या पदावर कार्यरत परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील अन्याय दूर न झाल्यामुळे परिचारिकांच्या पदरी घोर निराशा आली आहे. अधिपरिचारिका (डींरषष छींीश)/ परिसेविका (डळी-खपलहरीसश), पदावरील कर्मचारी हे प्रत्यक्षपणे जिवाची पर्वा न करता रुग्णसेवा देतात. कोव्हिड काळात परिचारिकांनी सण/उत्सव, मुलंबाळं, कौटुंबिक जबाबदाऱ्या बाजूला ठेवून रुग्णांची सेवा केली. आजही करत आहेत, तर पाठयनिर्देशिका पदावरील कर्मचारी परिचारिकांना शिक्षण देण्याचे कार्य करतात म्हणूनच मा. पंतप्रधान यांनी परिचारिकांना फ्रंटलाईन योद्धा असे संबोधले आहे. या पदावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील त्रुटी दूर न झाल्याने शासन दरबारी परिचारिका संवर्ग हा कायम दुर्लक्षित असल्याची राज्यातील परिचारिकांची धारणा झाली आहे. यामुळे परिचारिकामध्ये संतप्त भावना निर्माण झालेल्या असतानाच, वैद्यकीय शिक्षण विभागाने दि ६ जून रोजी परिचारिकांच्या कंत्राटी भरतीचे परिपत्रक निर्गमित केले असून त्याचा तीव्र निषेध परिचारिका संवर्गामधून केला जात आहे. सन २०२२ मध्ये शासनाने परिचारिकांच्या कंत्राटी भरतीचा शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यास राज्यभरातून कडाडून विरोध झाला होता. इतकेच नव्हे तर मे २०२२ मध्ये १० दिवस बेमुदत आंदोलन राज्यातील परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांनी केले होते. त्यानंतर हा निर्णय रद्द करुन कायमस्वरूपी पदभरतीची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू केल्याचे शासनाच्या वतीने संघटनेस पत्राद्वारे कळविण्यात आले होते. राज्यात वाढत्या लोकसंख्येनुसार परिचारिकांच्या विविध स्तरावरील पदांची नियमित पदनिर्मिती, १००% कायमस्वरूपी पदभरती आणि १००% पदोन्नतीसाठी महाराष्ट्र राज्य परिचारिका सातत्याने पाठपुरावा करीत असून परिचारिकांच्या या मागण्याकडे शासन स्तरावर वर्षानुवर्षे दुर्लक्ष केले जात असून ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे. रुग्णसेवेचा कणा मानल्या जाणाऱ्या परिचारिका कायमच,केवळ उपेक्षित राहत असून, या गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रत्येक वेळी परिचारिकांना आंदोलनच करावे लागेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यामुळे परिचारिका मध्ये संताप व्यक्त केला जात आहे. यास्तव अधिपरिचारिका, परिसेविका, पाठयनिर्देशिका या पदारील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन त्रुटी दूर करणे तसेच परिचारिकांची कंत्राटी भरती रद्द करून तात्काळ १००% कायमस्वरूपी पदभरती सुरू करण्यात यावी. पदोन्नतीने भरावयाची जवळपास ५०% हून अधिक रिक्त पदे तात्काळ पदोन्नतीने भरण्यात यावी. ४० वर्षापासून परिचारिकांचे प्रलंबित असलेले भत्ते मंजूर करावे व इतर महत्वाच्या प्रलंबित मागण्याच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर या शासन मान्यता प्राप्त संघटनेसह राज्यातील परिचारिकासाठी काम, करणाऱ्या इतर समविचारी संघटनांना सोबत घेऊन, १ जुलै २५ पासून, राज्यव्यापी तीव्र आंदोलन केले जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या राज्यसरचिटणीस श्रीमती सुमित्रा तोटे यांनी दिली.

# शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन मराठवाड्याला समन्यायी पाण्याचे वाटप झाले पाहिजे - भाई जयंत पाटील

## मराठवाड्यात नवीन युवकांना काम करण्याची संधी मिळणार

केज/प्रतिनिधी –मराठवाडा हा सातत्याने सतत दुष्काळी झळा सहन करत असतो, तर पश्चिम महाराष्ट्र सह इतर काही भागात महापुरामुळे गावेची गावे पाण्याखाली येतात. वास्तविक मराठवाड्याचे हक्काची समन्यायी पाण्याची मागणी अनेक दिवसांपासून असताना देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे काही लोक केवळ मराठवाड्याला समन्यायी पाणी करण्याच्या केवळ वल्गाणा करून मराठवाड्यातील जनतेला वेड्यात काढण्याचे काम करत आहेत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापी खपवून घेणार नाही तर मराठवाड्याला समन्यायी पाणी वाटप झाल्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसणार नाही अशी घोषणा शेतकरी कामगार पक्षाचे नेते सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी केली. पक्ष बांधणी संदर्भात




नवीन चेहऱ्यांना संधी देणार असल्याचे वक्तव्य जयंत पाटील यांनी बोलुन दाखवले.
मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रा.एस.व्ही.जाधव होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पक्षाचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर, महिला आघाडीच्या ड.मानसी म्हात्रे ,भाई बाबुरावजी लागारे ,चित्रलेखा गोळेगावकर नारायण गोले पाटील, भाई उदय गवारे, विष्णुपंत घोलप, ड. गोविंद डुमणे, बाळासाहेब धस यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी, तुषार गोळेगावर ,किरण खपले, अमोल दिक्षीत, उत्तम अमृतराव, सुशिल सोमवंशी, राजाराम रसाळ, आसद बल्खी, शिवाजी सुरवसे, राजु सुरनर, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेळावा समन्वयक भाई मोहन गुंड यांनी केले, सुत्रसंचलन हनुमंत घाडगे सर यांनी केले. तर आभार प्रा.उमाकांत राठोड यांनी केले. अशोक रोडे,ड. निखिल बचुटे,मुंजा पांचाळ, मंगेश देशमुख यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

केजध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या विभागीय मेळाव्याच नियोजन कमी वेळात मोहन गुंड यांच्या टिमणे केल याच कौतुक पक्षाच्या वरिष्ठांनी केले, सर्वांशी संपर्क असणाऱ्या मोहन गुंड यांना पक्षाने जबाबदारी द्यावी आस कार्यकर्ते बोलून दाखवत होते, त्यामुळे लवकरच मोहन गुंडवर जिम्मेदारी पडेल कालच्या मेळाव्यातुन दिसून आले आहे व तशा उपस्थित आतून चर्चा ऐकण्यास मिळाले आहेत.

# राजेगावचा रस्ता बनला मृत्यूचा सापळा; दवाखान्यात जाणाऱ्या रुग्नांचा जिव धोक्यात!

### मेटे साहेबांची भासतेय उणीव ; ज्योतीताई गावाकडच्या रस्त्यावर एकदातरी येवुन बघाच

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असुन ठिकठिकाणी रस्त्यावर दोन दोन फुट खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरुन वाहणे चालवणे तर सोडाच परंतु धड पायी देखील चालता येत नाही. तालुक्यातील रस्ते बेवारस स्थितीत पडले आहेत. या रस्त्यावरून शेतकरी बांधव पाईप लाईन करुन रस्ते खोदून टाकले आहेत. त्यामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. मात्र सा.बां.विभागाचे अधिकारी किंवा कर्मचारी याकडे ढुंकूनही पाहत नसल्याने या बेवारस रस्त्याला वालीच नसल्याचे दिसुन येत आहे.
त्याच प्रमाणे राजेगावकडे जाणारा रस्ता अक्षरशः खड्याने व्यापुन गेला असुन या रस्त्यावरून रुग्नांना दवाखान्यात नेहणे अवघड होऊन बसले आहे.
यावरून मेटे साहेबांची नक्कीच उणीव भासत असुन जिल्हाभर फिरणाऱ्या ज्योतीताईंनी एकदा आपल्या राजेंच्या राजेगावकडे यावेच अशी आर्त हाक या भागातील जनता देत आहे.
याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील कैक रस्ते खोदून टाकल्यागत झाले असल्याचे पहावयास मिळत असुन या सत्याकडे पाहण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना किंवा कर्मचारी यांना वेळ नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने उन्हाळ्यात तर या रस्त्याचे कामे केलेच नाहीत. परंतु दोन दोन फुट खोल पडलेल्या खड्ड्यात किमान








माती तरी टाकुन खड्डे बुजवणे गरजेचे आहे.मात्र असे होताना काही दिसत नाही. कारण या दुरावस्था झालेल्या रस्त्याच्या बातम्या अनेक पत्रकार बांधवांनी वर्तमान पत्रातील प्रसिद्ध केल्या होत्या तरी गेंड्याची कातडी पांघरलेल्या आणि झोपेचे सोंग घेतलेल्या निगरगट्ट अधिकाऱ्याला याच काही देणंघेणं राहीलेले नाही. कारण केज ते नांदूरघाट राष्ट्रीय मार्ग ६४ वरुन ई.जि.मा.१३० सांगवी सारणी ते राजेगाव आणि मांजरा नदी सीमेपर्यंत रस्ता जातो. त्यापैकी केज बीड अर्थात सांगवी सारणी ते राष्ट्रीय मार्ग ६४ पर्यंत या रस्त्याचे काम काही दिवसांपुर्वीच केले आहे. परंतु रा.मा. ६४ येथुन ई.जि.मा.१३० म्हणजेच राजेगाव पाण्याची टाकी ते राजेगाव मांजरानदी जिल्हा हद्दी पर्यंतचा रस्ता हा पाणी देखील चालण्या लायक राहिला नाही. याच रस्त्यावर राजेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र असुन या रस्त्यावरून रोज रुग्णांची येजा असते अतिशय कठीण परिस्थितीतून मार्ग काढत या रस्त्यावरून जावे लागत असुन दुचाकीवरून जाणे तर जिकिरीचे झाले आहे. त्यात जर एखादी गरोदर महिलेला प्रसुतीसाठी या प्राथमिक आरोग्य केंद्रात नेहायाचे असेल तर काय होईल याची कल्पना न केलेली बरी. या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे सा.बां.विभागाच्या अधिकारी यांना अनेक वेळा सांगण्यात आले. मात्र या अधिकाऱ्यांना या रस्त्याकडे पाहण्यासाठी वेळ नाही. त्यांना जनतेने पायघड्या घातल्या आहेत.तरी या रस्त्याचे काम करत नाहीत. आज जर का स्व.विनायकराव मेटे साहेब असते तर या रस्त्याची दयनीय अवस्था झाली नसती. या भागात मेटे साहेबांनी अनेक जनतेच्या हिताची कामे केले होते. मात्र या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे स्व.विनायकराव मेटे साहेबांची उणीव भासत आहे. मात्र सर्व जिल्ह्यात जनतेच्या विविध प्रश्नांवर स्व.विनायकराव मेटे यांच्या पत्नी डॉ.ज्योतीताई मेटे या काम करत असल्या तरी स्वता:च्या गावचा रस्ता उखडून गेला असुन त्यावर चालणे अवघड झाले आहे. त्यांनी त्यांच्या राजेगाव गावच्या या रस्त्यावर एकदा येवुन हे रास्ता बघायलाच पाहिजे. अशा प्रतिक्रिया या परिसरातील जनतेतून बोलले जात आहे.

## जलसंधारण उपविभागीय अधिकारी श्री ढाकणे यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी-रिपाईची मागणी

केज/प्रतिनिधी-केज येथील जलसंधारण उपविभागीय अधिकारी श्री ढाकणे यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी अशी लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार केज यांच्याकडे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांनी मागणी केली आहे.
याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज येथील जलसंधारण उपविभागाचे उपविभागीय अधिकारी श्री ढाकणे यांनी सन २०२१ ते २०२५ मधील जे केज तालुक्यात के.टी. वेअर, पाझर तलाव,सिंचन तलाव, गॅबियत बंदरा, नाला खोलीकरण व दुरुस्तीचे केलेली कामे आहेत.
त्याचबरोबर नवीन जे कामे सन २०२४ ते २०२५ मध्ये कामे झालेले आहेत त्याची चौकशी करावी व भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी. तसे ज्या ठिकाणी नवीन दुरुस्तीची कामे झालेली आहेत त्याची आपण स्वतः जातीय निहाय चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी रिपाईच्या वतीने लेखी निवेदनाद्वारे केज तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली आहे. अन्यथा८ दिवसात चौकशी न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट केज तालुक्याच्या वतीने केज तहसील



कार्यालयासमोर दिनांक २४ जून २०२५ रोजी आमरण उपोषण किंवा निदर्शने करण्यात येतील असा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे.
सदर निवेदनाच्या प्रती तहसीलदार केज, जिल्हाधिकारी बीड, जलसंधारण अधिकारी बीड, जलसंधारण मंत्री,महाराष्ट्र राज्य मुंबई,यांना दिल्या आहेत. सदर मागणीचे लेखी निवेदन हे केज तहसीलचे पेशकर ननवरे यांनी स्वीकारले आहे.
या लेखी निवेदनावर रिपाईचे मराठा आघाडीचे जिल्हाध्यक्ष नवनाथ तपसे, रिपाई चे केज तालुकाध्यक्ष सुनील हिरवे, कार्याध्यक्ष ईश्वर भाऊ सोनवणे, उपाध्यक्ष सतीश घोडके, शहराध्यक्ष अमोल मस्के, सचिव विजय सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बाळ पोटातच दगावून रक्तस्राव; गर्भपिशवी काढल्याने महिलेचा वाचाला जीव

## जिल्हा रुग्णालयात शस्त्रक्रिया करून बारा तास व्हेंटिलेटरवर

बीड/प्रतिनिधी –खेळताना लहान मुलाने गर्भवतीच्या पोटावर उडी मारली. त्यामुळे नऊ महिने पूर्ण होऊन बाळ पोटातच दगावले. एवढेच नव्हेतर, अंतर्गत रक्तस्राव झाल्याने महिला अस्वस्थ झाली, डॉक्टरांनी आगोदर सिजर करून बाळ बाहेर काढले. परंतु तरीही रक्तस्राव थांबत नसल्याने डॉक्टरांच्या लक्षात येताच नातेवाईकांशी चर्चा करून गर्भपिशवी काढली. त्यानंतरही १२ तास महिला व्हेंटिलेटरवर होती. अखेर ती महिला ठणठणीत बरी झाली आहे. जिल्हा रुग्णालयात हे सर्व उपचार करण्यात आले.



बीड शहरातील एक महिला पेशन्ट वय २५ वर्षे, रा. बीड ही गर्भवती ६ मे रोजी दुपारी ४:३० वाजता दरम्यान रुग्णालयात आली. खाजगी दवाखान्यातील डॉक्टरांनी सदर महिलाही गंभीर आजारी झाल्याचे पाहताच हात झटकत रेफर केले. बीड येथील जिल्हा रुग्णालयात आल्यानंतर सर्व रिपोर्ट पाहून तिला सायंकाळी ७ –०० वा. दरम्यान शस्त्रक्रिया करण्यासाठी शस्त्रक्रियागृहात घेतले. डॉक्टरांनी तात्काळ सिजर करून मयत बाळ बाहेर काढले असता रक्तस्राव थांबत नसल्याने गर्भपिशवी काढली. तब्बल तीन तास ही शस्त्रक्रिया चालली. त्यानंतर सदर महिला रुग्णाला अतिदक्षता विभागात दाखल केले तब्बल १२ तास त्या महिला रुग्णास व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. त्यानंतर किडनीने काम बंद केल्याने त्या महिला रुग्णास दिनांक ७ मे रोजी दुपारी २–०० वा. दरम्यान छत्रपती संभाजीनगरला रेफर केले. तेथील डॉक्टरांनी बीडच्या डॉक्टरांनी केलेल्या उपचाराचे कौतुक केले. शुक्रवारी रोजी सदर महिला ही टाके तोडण्यासाठी जिल्हा रुग्णालयात आल्यावर तिने सर्व डॉक्टर, नर्स, ब्रदर यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. अशा अशा प्रकरची गंभीर शस्त्रक्रिया झाल्याने समाधान व्यक्त होत आहे. उपचार घेऊन ठणठणीत झालेल्या त्या महिला रुग्णासोबत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, डॉ. संतोष शहाणे, डॉ. लक्ष्मीकांत तांदळे यांच्यासह जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, कर्मचारी यांनी त्यांचे कौतुक करून पुढील आयुष्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

तीनरक्तपिशव्या, ४रक्तघटकदेऊनदेखील शस्त्रक्रियेदरम्यान त्या रुग्णाचा रक्तस्राव थांबत नव्हता. त्यामुळे सदर रुग्णास तीन रक्तपिशव्यांसोबतच चार रक्तघटक देण्यात आले. त्या महिला रुग्णाचा एचबी कमी होत असल्याने परिस्थिती गंभीर झाली होती. डॉक्टरांचे म्हणे आहे की,हा त्रास १०० मागे एका महिलेला होत अस्तो. गर्भशयाच्या पिशवीवर यात रक्त जमा होणे याला ब्रप्शीओ प्लांसेटी असे म्हणतात. साधारण १०० महिलांमागे एका महिलेला असा त्रास होऊ शकतो. खाजगी रुग्णालयात यावर उपचारासाठी ५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. या आजारामध्ये महिलाही दगावण्याची भीती असते.

कारणे काय?
रक्तदाब खूप जास्त असणे, रक्त कमी होणे, पोटाला मार लागणे.

काळजी काय घ्याल?
वेळोवेळी हिमोग्लोबिन तपासणे, रक्तदाबा तपासणी, स्त्रीरोगतज्ज्ञांकडून तपासणी करणे पोटाला मार लागलेला असल्यास सोनोग्राफी करून डॉक्टरांकडून औषधोपचार करणे, सदर महिला रुग्णावर उपचार करण्यासाठी दावाखान्यात सीएस, एसीएस तळ ठोकून होते. ही गंभीर शस्त्रक्रिया सुरू असताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संतोष शहाणे हे तळ ठोकून शस्त्रक्रिया डॉ. सूर्यकांत सावंत, डॉ. किरण शिंदे, डॉ. सोमनाथ वाघमारे,डॉ. अनंत मुळे, डॉ. मीता लांबोरे, मार्शल सान मामा आदींनी केली. निवासी वैद्यकीय एल.आर. तांदळे, मेढून रमा गिरी, डॉ. हन आदीनी समन्वय साधला. त्या महिला रुग्णाच्या नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, नर्स,ब्रदर यांच्यासह कर्मचारी यांचे शाल पुष्पहार देऊन सन्मान करून आभार व्यक्त केले. तसेच यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी सदर महिला रुग्णावर शस्त्रक्रिया करण्यासाठी वेळोवेळी नातेवाईकांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचेही त्यांनी आभार व्यक्त केले.

# साबला येथे नवनिर्वाचित महिला कर्मचारी यांचा सन्मान सोहळा संपन्न

केज/प्रतिनिधी – केज तालुक्यातील साबला ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने नवनियुक्त पोलिस कॉन्स्टेबल काकडे वैशाली, अंगणवाडी शिक्षिका काकडे शिवकांता,अंगणवाडी मदतनिस मुळे शोभा यांचा सन्मानित करण्यात आले. सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे,उपसरपंच कचराबाई,राजेंद्र सरवदे,सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,एआरटी संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक वली तांबोळी, प्रदिप दहिरे यांच्या सर्वांच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.

तसेच काकडे वैशाली यांनी गरिब पस्थितीवर मात करून शालेय प्राथमिक , माध्यमिक शिक्षण घेतले . वैशालीच्या मनामध्ये एक जिद्ध आपण आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिले ते वैशालीने पूर्ण करून दाखवले. सत्कार स्विकारत असताना असे म्हटले की,गावातील मुलांनी- मुलांनी शालेय शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करावी. जर नोकरी नाही लागली तर एखादा उदयोग व्यवसाय निवडावा आणि आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करावा.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE